Time : 3 Hours

# MARATHI LANGUAGE I

Subject Code

| H | 4 | 4 | 1 | 2 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 37** **(Printed Pages : 7)** **Maximum Marks : 80**

**सूचना :** (*i*) शुद्ध लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(*ii*) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

## विभाग 1 : व्याकरण

खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :

1. जन्म 1

2. विजय 1

खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :

3. आनंद 1

4. तरुण 1

खालील वाक्यात विरामचिन्हे घालून त्या वाक्यांचे पुनर्लेखन करा :

5. छान आहेस हो बाय जेवशील काय आमच्या घरी 1

6. पण कंबर पाठ व मान मात्र खूप त्रास देऊ लागली होती 1

खालील वाक्य शुद्ध करून लिहा :

7. बंघल्याच्या कर्जाचे हप्ते अन् अमरावतीच्या घराचे बाडे–अशा दुहेरी कर्चामुळे शेवटी मी नाईलाजास्तव त्यांना होकार कलवला. 2

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :

8. आतापर्यंतच्या श्रमानं <u>मी</u> पूर्णपणे दमून गेलो होतो <u>व</u> मला धाप लागली होती. तरीही <u>घाईघाईत</u> मी मोजा काढायला <u>लागलो</u>. 4

## विभाग 2 : गद्य आणि पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 6

9. रश्मीच्या भाचीने दहावीच्या पेपरचा कोणता अनुभव सांगितला ?

10. लेखकाच्या मते नंदनवन कोठे असते ?

11. युवकांसमोर आपण कोणते आदर्श उभे करायला हवेत ?

12. हिरीच्या आईच्या बोलण्याविषयी लेखिकेने काय सांगितले आहे ?

13. ले. कर्नल श्यान चव्हाण पुलाखालून वाहत जाताना कोणत्या नदीत पोहोचणार होते ?

14. घराजवळ येताच वाहनचालकाला हॉर्न का वाजवता आला नाही ?

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 6

15. संत नामदेवांच्या मते परस्त्रीकडे प्रापंचिकाने कोणत्या दृष्टीने पहायला हवे ?

16. ओव्या केव्हा गायल्या जातात ?

17. साधुपुरुषाचे अंतर कशाने वोसंडत असते ?

18. कुटुंबाच्या पालनपोषणाबद्दल महात्मा फुले यांनी काय सांगितले आहे ?

19. धरित्रीच्या कुशीत कोण निजले आहे ?

20. ''आवाहन'' या कवितेत कोणती प्रतिज्ञा केली आहे ?

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 5

21. ''काय व्हायचं ? फटफटलं तवा पळत आले गावात. पुन्ना म्हणून कधी रातच्याला भायेर गेले न्हायीत.''

**किंवा**

''हमको भगवानने कुछ भी संतान नही दिया .................. मे बी अवर बॅडलक.''

खालील प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळीत लिहा : 5

22. पत्र्याच्या पेटाऱ्यात कोंबल्यानंतर लेखक ले. कर्नल श्याम चव्हान यांची अवस्था कशी झाली ?

**किंवा**

सूनबाईंनी यंत्रमानवाबद्दल सासऱ्यांकडे कोणत्या तक्रारी केल्या ?

खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 5

23. ''त्या आठीच्या रेघेवर पण
सही ठोकिली मम नशिबानें
असा कसा मी मुकाच झालों;
मुकी जाहलिस तूहि कशाने ?

**किंवा**

'गोंदणावर खुलत असतो सूर्यलाल टिळा.
चार काळ्या मण्यांनीच साजरा दिसतो गळा''

खालील प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळीत लिहा : 5

24. 'बहरतील मळे' या कवितेत कवीने कोणता आशावाद व्यक्त केला आहे ?

**किंवा**

'नव्या शहराविषयी' या कवितेत अस्वस्थ झालेल्या कविमनाचे त्रित्रण कसे केले आहे ?

## विभाग 3 : लेखन

खालील शब्दांसाठी पारिभाषिक शब्द लिहा :

25. Backlog. 1

26. Dearness. 1

27. 'मेल्या म्हशीला मणभर दूध' या म्हणीचा अर्थाचा योग्य पर्याय लिहा : 1

(अ) मनुष्य गेला म्हणजे सत्वगुण आठवतात

(ब) मनुष्य गेला म्हणजे दुर्गुण आठवतात

(क) मनुष्य गेला म्हणजे गुण आठवतात

(ड) मनुष्य गेला म्हणजे अवगुण आठवतात

28. 'थेंब थेंब तळे साचे' या म्हणीचा वाक्यात उपयोग करा. 1

29. 'मनोरथ पूर्ण करणे' या वाक्यप्रचाराचा अर्थाचा योग्य पर्याय लिहा : 1

(अ) मन प्रसन्न होणे

(ब) इच्छा व्यक्त करणे

(क) मन मोकळे होणे

(ड) इच्छा पूर्ण होणे.

30. 'भंडावून सोडणे' या वाक्यप्रचाराचा वाक्यात उपयोग करा : 1

खालील कविता वाचून त्याच्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

पाऊस गावातला
रानी मृदंध पसरविणारा
पागोळ्यातून टपटपणारा
डोंगर दरयातून कोसळणारा
नदी नाले तुडुंब भरवणारा
ओलेती धरती पिकवणारा
बी बियाणे रुजवणारा
शेतकऱ्यांचे अश्रू पुसणारा
मन प्रफुल्लीत करणारा
नि
पाऊस शहरातला
कचरा भरल्या अंगणाचा
घरातून शिरलेल्या नाल्यांचा
खड्डे भरल्या रस्त्यांचा
गाड्या नि गर्दी अडकण्याचा
पाणी तुंबलेल्या वाटांचा
पाण्यात बुडालेल्या रूळांचा
चिखल काल्यात भरायचा
अश्रू भरल्या नयनांचा

— प्रतिभा कारंजकर

प्रश्न :

31. शेतकऱ्याचे मन प्रफुल्लीत का झाले आहे ? 1

32. गावातल्या पावसाबद्दल कविंनी आपले मत कसे व्यक्त केले ? 2

33. शहरातल्या पावसाचं वर्णन कविंनी कसे केले आहे ? 2

34. खालील उताऱ्याचा **एक** तृतीयांश सारांश लिहा : 4

सौजन्य हे सुजनांकडून अपेक्षावयाचे असते. ज्यांच्या मनात प्रेम, सहभावना, आपुलकी, स्नेहशीलता आहे, अशाजवळ सौजन्य असते. सौजन्याला नम्रतेची जोड मिळाली तर सोन्याहून पिवळे होते. जगात वावरताना सौजन्यशील वृत्ती अंगी बाणलेली असली तर अनेक फायदे होऊ शकतात; पण त्याहीपेक्षा आपण माणुस आहोत, पशू नाही याची जी जाणीव होते तीच महत्वाची असते. ज्याची वृत्तीच आक्रमक असते आणि ज्यांचा स्वभाव जुळवून घेण्याचा नसतो, त्यांची वृत्ती ही स्वभावतः पशूची असते. त्यामुळे, त्यांच्याजवळ सौजन्य असेल कसे ? सौजन्य ही मानसिक वृत्ती आहे. मनातून ती साकारते व कृतीतून प्रकट होते. व्यवहारात अशा वृत्तीतून जे वागणे होते किंवा आचार घडतो अशाच आचाराला सौजन्य म्हटले जाते. सौजन्यातून प्रेम व्यक्त होते.

35. पेडणे येथील 'कीर्ती उच्च माध्यमिक विद्यालयात' गोवा मुक्तिदिन साजरा झाला. त्याचा वृत्तांत **10** ते **12** ओळीत लिहा. 5

36. दै. गोमंतकमध्ये आलेली खालील जाहिरात वाचून आपण मनीष देसाई/मनिषा देसाई, आशीर्वाद 44, एकतानगर, पणजी गोवा असे समजून खाली नमूद केलेल्या पदासाठी अर्ज करा. 6

दै. गोमंतक

दिनांक 25 जुलै 2024

पाहिजे

गणित शिक्षक

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | — | विज्ञान शाखेचा पद्‌वीधर |
| | — | संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक |
| अनुभव | — | कमीत कमी तीन वर्षे |
| संपर्क/अर्ज करा | — | |

प्राचार्य

शारदा उच्च माध्यमिक विद्यालय

तालीगांव,

पणजी, गोवा.

37. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **पंचवीस** ओळींचा निबंध लिहा : 10

(अ) गोवा—राष्ट्रीय खेळ महोत्सव

**किंवा**

(आ) निसर्ग-एक कलावंत

**किंवा**

(इ) वीज बंद पडली तर

**किंवा**

(ई) अज्ञानाचे फायदे-तोटे.